Postal Lic./AMT/RNP/492/2023-2025

वरुड | मंगळवार
१७.०६.२०२५

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०६ | अंक: ११६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### आषाढीसाठी रेल्वे कडून ८० विशेष गाड्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**सोलापूर** - आषाढी-कार्तिकी भक्तगण येती म्हणत पंढरीच्या विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी लाखो वारकरी पंढरीत दाखल होतात. कार्तिकीनंतर वारकऱ्यांना वेध लागलेले असतात ते आषाढी वारीचे.

पावसाळ्याला सुरुवात होताच, वारीची लगबग सुरु होते आणि शेकडो दिंड्यांतून हजारो वारकऱ्यांच्या पाऊले पंढरीच्या दिशेने पडतात. लाखो वैष्णवांचा मेळा पंढरपूरमध्ये जमतो. त्यामुळे, शासन आणि प्रशासनही नागरिकांच्या, भाविकांच्या सेवेसाठी सज्ज असते. सोलापूर जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्यावरही मोठी जबाबदारी असते.

# शेतीसाठी एआय धोरण मंजूर

### मंत्रिमंडळ बैठकीत १० मोठे निर्णय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### आणीबाणीत कारावास भोगलेल्यांचं मानधन दुप्पट



**मुंबई** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज संपन्न झाली. या बैठकीत १० मोठे निर्णय घेण्यात आले असून राज्यात शेतीसाठी एआय धोरणास मंजुरी देण्यात आली आहे.

यासह, आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५ ते २०२९ मंजूर करण्यात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करुन कृषि क्षेत्रात परिवर्तन घडविता येणार आहे. त्यामुळे, मंत्रिमंडळ बैठकीतील हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. यासह, धारावी पुनर्विकास, अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील १० मोठे निर्णय ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरु उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार. (महसूल विभाग) एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाचा मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार. मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार. (महसूल विभाग) धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनवर्सन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार. (महसूल विभाग) केंद्र सरकारच्या प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामान विषयक अचूक माहिती मिळावी यासाठीचा प्रकल्प. शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महत्वाचा प्रकल्प. (कृषि विभाग)

# नागपूरमध्ये इंडिगोच्या विमानाचं इमर्जन्सी लँडिंग, बॉम्ब ठेवल्याचा फोन, एअरपोर्टवर एकच पळापळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नागपूर** - नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमान तळावरुन एक खळबळजनक बातमी समोर आली आहे.

यात कोच्चीवरुन दिल्लीकडे जाणाऱ्या इंडिगोच्या विमानाने नागपूरमध्ये अचानक इमर्जन्सी लँडिंग केलं आहे. विमानामध्ये बॉम्ब ठेवल्याचे कॉल आल्यानंतर नागपुरात विमानाचे लँडिंग करवण्यात आलं आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्ष्यात घेता सध्या विमानाची तपासणी सुरु करण्यात आली आहे.

नागपूर पोलीस आणि अग्निशमन दल विमानतळावर दाखल झाले असून विमानाची तपासणी सुरु आहे. मात्र या प्रकरणामुळे एअरपोर्टवर काही वेळ एकच पळापळ आणि गोंधळ उडाल्याचे बघायला मिळाले आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार, गेल्या वीस मिनिटापूर्वी विमान नागपूर विमानतळावर उतरलं आहे. तपासादरम्यान अजूनपर्यंत काहीही धोकादायक वस्तू आढळलेली नाही. मात्र पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून ते कसून तपास सध्या करत आहे. पोलीस आणि अग्निशमन पथकाकडून कसून तपास सुरू पुढे आलेल्या माहितीनुसार, हे विमान सकाळी ९.२० वाजता कोचीहून निघालेले आणि दुपारी १२.३५ वाजता दिल्लीत उतरणारे होतं.

अशातच विमानातील अधिकाऱ्यांना धोकादायक इशारा मिळाल्यानंतर हे विमान नागपूरला वळवण्यात आले. कोची विमानतळावरील अधिकाऱ्यांनी या धोक्याची पुष्टी केली, ज्यामुळे आपत्कालीन प्रोटोकॉल वाढवण्यात आले आणि सुरक्षा एजन्सींशी तात्काळ समन्वय साधण्यात आला.

# १३ वर्षीय मुलाला गळा चिरुन संपवलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### मृतदेह शेतात फेकून दिला

### नरबळीच्या संशयानं गावकऱ्यांमध्ये दहशत





**जळगाव** - जिल्ह्यात एरंडोल तालुक्यात धक्कादायक घटना समोर आली आहे. १३ वर्षीय मुलाची गळा चिरुन त्याची हत्या करुन त्याचा मृतदेह फेकून दिल्याची घटना खर्ची गावात समोर आल्याने खळबळ उडाली आहे. तेजस महाजन असे मृत झालेल्या मुलाचे नाव असून, ही घटना नरबळीसाठी तर झाली नाही ना? असा संशय ग्रामस्थानी व्यक्त केला आहे. पोलिस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील खर्ची गावात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. रिंगणगाव येथे राहणाऱ्या १३ वर्षीय तेजस गजानन महाजन या बालकाचा गळा चिरुन खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे.

त्याचा मृतदेह शेजारच्या खर्ची गावाजवळ एका शेतात सापडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही हत्या नरबळीच्या उद्देशाने तर करण्यात आली नाही ना, असा संशय आता ग्रामस्थांकडून व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. सोमवारच्या बाजारात संध्याकाळी फिरत असताना तेजसने एका दुकानावर जाऊन बिर्याणी घेतली. नंतर संध्याकाळी सात वाजल्यापासून तर कोणालाच दिसला नाही. बेपत्ता झाला. त्यामुळे गावात शोधकार्य सुरु झालं. जवळपास पहाटे तीन वाजेपर्यंत सर्वांनी तरुणाला शोधलं. पण तो सापडला नाही.

बाजार परिसर थोडा आत असल्यामुळे तिथे कोणाचे लक्ष गेलं नाही. मात्र नंतर एका व्यक्तीला मृतदेह आढळून आला. त्या व्यक्तीने पोलिसांना कळवल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.

मुलाची गळा चिरुन हत्या तेजस महाजन हा आपल्या कुटुंबासह रिंगणगाव येथे राहत होता. १६ जूनपासून तो बेपत्ता झाला होता. मुलगा सापडत नसल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. परंतु कुठेही काही माहिती मिळाली नाही. अखेर आज रोजी एरंडोल पोलीस ठाण्यात तेजस हरवल्याची नोंद करण्यात आली होती. पोलिसांनीही परिसरात शोधाशोध सुरु केली होती. दरम्यान, खर्ची गावाजवळील एका शेतात तेजसचा मृतदेह आढळून आला.

# काँग्रेस नात्यागोत्याचा पक्ष झालाय, पक्ष नेतृत्वहीन आहे

### अशोक चव्हाणांची टीका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नांदेड** - राज्याचं राजकारण अनिश्चितेचं बनलं असून कधी कोण कुठल्या राजकीय पक्षात आणि कुणासोबत युती करेल हे सांगता येत नाही.

नाशिकमधील शिवसेना ठाकरे गटाचे नेते सुधाकर बडगुजर यांनी आजच भाजपात प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. भाजप नेतृत्वावर गंभीर आरोप करणारे, टीका करणारे बडगुजर यांचा भाजप प्रवेश अनेकांसाठी आश्चर्यकारक आहे.

दुसरीकडे सांगलीतील काँग्रेस नेत्या आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांच्या नातसुनेनं काँग्रेसचा हात सोडून भाजपचं कमळ हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यावरुन, अनेकांना आश्चर्य वाटत आहे.

त्याच संदर्भाने माजी काँग्रेस नेते व विद्यमान भाजप खासदार अशोक चव्हाण यांना प्रश्न विचारला असता त्यांनी काँग्रेस नेतृत्वावर टीका केलीय, काँग्रेस नेतृत्वहीन झाल्याचं चव्हाण यांनी म्हटलं. दिवंगत वरिष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या नातसुनेने सांगलीत काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली असून लवकरच त्या भाजपमध्ये पक्ष प्रवेश करणार आहेत. त्याच अनुषंगाने माजी मुख्यमंत्री आणि भाजप खासदार अशोक चव्हाण यांना प्रश्न विचारला असता त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली.

WANKHADE INSTITUTE OF MEDICAL SCIENCES
DIRECT ADMISSION
M.B.B.S.
ADMISSION COUNSELING CENTRE/
TUITION CLASSES, WARUD DIST.AMRAVATI
8007447393
9373321848

माऊली टाईपरायटींग अँन्ड कॉम्प्युटर इन्स्टीट्युट
Admission Open
Maharashtra Government Authorised Institute
COMPUTER TYPING COURSE
GCC - TBC - SSD
English 30/40/50 -wpm
Marathi 30/40-wpm
Hindi 30/40-wpm
MKCL
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स
जिजाऊ नगर, जुन्या शांतीनिकेतन कॉन्व्हेंट जवळ, वरुड

# ग्राम पंचायत सरपंचाची ऑडिओ क्लिप वायरल झाल्यामुळे तालुक्यात मोठी खळबळ

- १ कोटी ४३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर
- ठेकेदाराला सरळ २ टक्के कमिशनची मागणी
- दीपाली कन्स्ट्रक्शन कंपनी दिल्लीने घेतले कंत्राट
- बांधकामासाठी माती मिश्रित काळ्या रेतीचा वापर

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

*नरखेड* – तालुक्यातील मोवाड व जलालखेडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या कामाचे कंत्राट दीपाली कन्स्ट्रक्शन कंपनी दिल्ली यांनी घेतले असून प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी १ कोटी ४३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून बांधकामाला सुरूवात करण्यात आली आहे. बांधकाम सुरु असताना बांधकामात माती मिश्रित काळ्या रेतीचा वापर करण्यात येत असून बांधकाम व्यवस्थित होत नसल्याचे दिसून आले असता स्थानिक नागरिकांनी या बाबत सरपंच यांना सांगितले. सरपंच यांनी थेट काम करणाऱ्या कंपनीच्या संबंधित व्यक्तीला फोन केला जर काम करायचं असेल तर २ टक्के कमिशनची द्यावे लागेल असे म्हटले. तर सरपंच इतक्यावर थांबले नाही त्यांनी कंपनीच्या व्यक्तीला नरखेड तालुक्यातील राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या मोठ्या नेत्याला भेटून बोलून घ्या ते गृहमंत्र्यांचे एकदम जवळचे आहे. ते सर्व बरोबर करतील त्यांना भेटल्यावर कसलीही तक्रार येणार आहे. तसेच पत्रकारांना सुद्धा आम्ही पाहून घेऊ त्यांनाही पैसे द्यावे लागेल असे सरपंच यांनी संबंधित व्यक्तीला म्हटले आहे.




जलालखेडा पोलिस स्टेशन येथे सरपंच यांच्या विरोधात तक्रार देताना नरखेड तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी

> ◆ प्राथमिक आरोग्य केंद्रात जे काम सुरु आहे ते निकृष्ट दर्जाचे आहे, पाहणी करायचा गेलो असता माती भरलेली डस्ट, काळी रेती, बीम तुटलेले आढळले. मी संबंधितांना काम थांबविण्यास सांगितले, पण सरपंच यांनी दोन टक्केची मागणी करुन काम सुरु ठेण्यास सांगितले ते गावच्या राष्ट्रवादीच्या एका आकाचे चे नाव सांगून ठेकेदारास शाश्वती देतात की काम सुरु ठेव अशी ऑडियो क्लीप वायरल झाली आहे.
>
> **–मयूर सोनोने**

> ◆ मी अशा प्रकारच कसलीही विधान केली नाही. मला बदनाम करण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. माझे नाव सांगून विरोधक हे काम करत आहे.
>
> **–कैलास निकोसे**

> ◆ अश्याच मनमानी कारभाराला त्रस्त होऊन आम्ही १० सदस्यांनी सरपंच यांच्यावर अविश्वास घेण्यात आला होता बोगस काम करणाऱ्या पासून २ टक्के द्या आणि बोगस काम बिनधास्त करुन घ्या अशी त्यांची भूमिका चिंताजनक आहे, ऑडियो क्लीप वायरल झाल्यावर सरपंच यांनी त्यांच्या आकाचे नाव घेऊन संबंधित ठेकेदाराला दोन टक्केची मागणी केल्याचे समजते त्याची ऑडियो क्लीप सामोरं आली आहे.
>
> **–मयूर ज्ञा.दंढारे**

त्यामुळे सरपंच यांनी पत्रकाराविषयी केलेलं विधान निंदनीय असून या बाबत नरखेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने पोलिसात तक्रार देण्यात आली आहे. झालेल्या संभाषणाची क्लिप वायरल झाल्याने तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामात माती मिश्रित काळी रेती वापरली जात असताना सरपंच त्यांना चांगलं काम करण्याचे न सांगता २ टक्के कमिशनची मागणी करतात ही खूप गोष्ट आहे. त्यामुळे सरपंच यांच्यावर सुद्धा कार्यवाही होणे गरजेचे आहे.

**पत्रकारांनी केली सरपंचाची पोलिसांकडे तक्रार**

वायरल झालेल्या क्लिपमध्ये सरपंच बोलताना म्हणतात की २ टक्के कमिशन द्या मग मी पत्रकार यांना पाहून घेईल ते काहीच अडचण आणणार नाही. त्यामुळे पत्रकारांची छबी खराब करणाऱ्या सरपंचाची तक्रार नरखेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने सोमवारी जलालखेडा पोलिसात तक्रार केली असून गुन्हा दाखल करण्याची मागणी या तक्रारीत केली आहे.

**पोलिसांच्या कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष**

सरपंच यांनी पत्रकारांविषयी केलेले विधान चुकीचे असून या बाबत पत्रकार संघाने सरपंच यांची जलालखेडा पोलिसात तक्रार केली असून यात सरपंच यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी पत्रकार संघाने केली आहे.

# ‘डेडबॉडीला नीट कपडा गुंडाळतो, २ हजार द्या...’

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

*मुंबई* – मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाणं म्हणजे काय? याचीच प्रचिती देणारा एक धक्कादायक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. असं म्हणत मृतांच्या नातेवाईकांना लुबाडल्याचा संतापजनक प्रकार नवी मुंबई पालिकेच्या वाशी रुग्णालयात घडला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, एका २३ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना नवी मुंबईतील ऐरोली परिसरात घडली होती. या घटनेनंतर तिचा मृतदेह नवी मुंबई महापालिकेच्या वाशी रुग्णालयात आणण्यात आला. तरुणीचा मृतदेह ताब्यात घेण्यासाठी तिचे नातेवाईक रुग्णालयात आले असता त्यांच्यासोबत एक धक्कादायक प्रकार घडला. तरुणीच्या मृतदेहाला कपडा व्यवस्थितत गुंडाळून देतो, २००० रुपये द्या अशी मागणी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी केली. हा सर्व प्रकार कॅमेऱ्यामध्ये कैद झाला असून सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संताप व्यक्त केला जात आहे.

# अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस युवा प्रपोस्ट महाराष्ट्र राज्य कार्यकारणी चर्चा सत्र बैठक

**(वार्ताहर वरुड दर्पण)**

*धामणगावरेल्वे* – अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस युवा प्रपोस्ट महाराष्ट्र राज्य कार्यकारणी चर्चा सत्र बैठकीचे आयोजन आज १५ जून रोजी अकोला येथील शासकीय विश्रामगृह येथे करण्यात आले होते.




या बैठकीला युवा प्रपोस्ट प्रदेशाध्यक्ष ओकेश सारवान, माजी प्रदेश अध्यक्ष राहुल टाक, प्रदेश कार्य अध्यक्ष संजय तंबोली, प्रदेश सचिव ललित टाक, अनिल झुंज, अकोला जिल्हा अध्यक्ष रंजीत संगीले, अकोला शहर अध्यक्ष हरनाम सिंह रोहेल, नागपुर जिल्हा अध्यक्ष नितिन डागोर, चंद्रपुर जिल्हा अध्यक्ष शुभम डगोरिया, अमरावती जिल्हा अध्यक्ष उमेश सारसर, मंगल गौहर, लखन पीवाल, विजय मिलादे, लखन तंबोली, सह ३६ जिल्ह्यातील प्रतिनिधींची उपस्थिती होते. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्ष ची निवड या बैठकीत करण्यात आली. लवकरच मुंबई येथे अधिवेशन घेण्याचे देखील या चर्चा सत्र बैठकीत ठरवण्यात आले. तसेच विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

# मोझरी, कौंडण्यपूर, वलगाव विकास आराखड्यातील कामांचा आढावा

## आराखड्यातील उर्वरित कामे पूर्ण होण्यासाठी नियोजनपूर्वक प्रस्ताव सादर करा : विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**



*अमरावती* – जिल्ह्यात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी श्रीक्षेत्र मोझरी, संत गाडगेबाबा निर्वाणभूमी वलगाव आणि श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे विकास आराखड्याद्वारे संतांच्या अनुयायी, भक्त, नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी मोठा निधी उपलब्ध करुन देऊन अनेक वैशिष्ट्यपूर्ण कामांना चालना देण्यात आली आहे. विकास आराखड्यातील उर्वरित कामे व नव्याने राबवावयाच्या वैशिष्ट्यपूर्ण कामांबाबत सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विकास आराखडा कार्यकारी समितीच्या अध्यक्षा तथा विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना आज दिले. विविध विकास आराखड्यांबाबत कार्यकारी समितीची बैठक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. आमदार राजेश वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपायुक्त (नियोजन) कावेरी नाखले यांच्यासह कार्यान्वयन यंत्रणांचे अधिकारी तसेच मोझरी, वलगाव, कौंडण्यपूर तीर्थक्षेत्र संस्थांचे विश्वस्त, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ.सिंघल म्हणाल्या की, आराखड्यातील प्रत्येक काम वैशिष्ट्यपूर्ण आहे. दर्जेदार सुविधांची निर्मिती याद्वारे होत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी असलेल्या मोझरीच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाने १५० कोटी ८३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे.

यातून त्याठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आध्यात्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संकुल, ग्रामगीतेवर आधारित ग्रामविकास प्रबोधिनी, ग्रामीण रुग्णालय, स्मृती संग्रहालय, भक्त निवास, महासमाधी सौंदर्यीकरण, बसस्थानक, आयुर्वेदिक रुग्णालय आदी विकासकामे झाली आहेत.

# धरती आबा जनभागीदारी अभियानांतर्गत माहिती, शिक्षण व संवाद शिबिराचे आयोजन

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

*अमरावती* – जिल्ह्यातील आदिवासी व आदिम जमातीच्या समुदायांचे जीवनमान उंचावण्यासाठी ‘धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान’ आणि केंद्र सरकारच्या ‘प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत’ विविध शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १५ ते ३० जून या कालावधीत ‘धरती आबा जनभागीदारी अभियान’ राबविण्यात येणार आहे.

या विशेष अभियानांतर्गत धारणी तालुक्यात २३ जून रोजी धारणी, २४ जून रोजी कळमखार आणि २६ जून रोजी सुसर्दा येथे, तर चिखलदरा तालुक्यात १८ जून रोजी सलोना, २४ जून २०२५ रोजी चिखली येथे आणि २६ जून रोजी हतरु येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जनजागृती तथा लाभ वितरण शिबिरे घेण्यात येणार आहेत. ‘धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान’ आणि ‘प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान’ या दोन्ही महत्त्वाकांक्षी योजनांद्वारे आदिवासीबहुल गावांमध्ये पक्की घरे (प्रधानमंत्री आवास योजना), रस्ते (प्रधानमंत्री ग्रामसडक योजना), पाणीपुरवठा (जल जीवन मिशन), घरांचे विद्युतीकरण, नवीन सौरऊर्जा योजना, फिरती आरोग्य पथके (राष्ट्रीय आरोग्य अभियान), आयुष्यमान भारत कार्ड (प्रधानमंत्री जनआरोग्य योजना), एलपीजी कनेक्शन्स (प्रधानमंत्री उज्ज्वला योजना), अंगणवाडी केंद्रांची स्थापना (पोषण अभियान), वसतिगृहांची स्थापना (समग्र शिक्षा अभियान) इत्यादी बाबींवर विशेष मोहीम राबवून काम करण्यात येत आहे.

‘प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत’ जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यातील एकूण ३ गावांचा समावेश आहे. या अभियानातून उसळगव्हाण येथील १७ आणि बोरगाव धांडे येथील ४ अशा एकूण २१ लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. यातील २० घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच, सन २०२५-२६ या वर्षात नायगाव, ता.धामणगाव रेल्वे येथील २० लाभार्थ्यांच्या घरकुल मंजुरीची कार्यवाही सुरु आहे. या गावांमध्ये १०० टक्के आदिम जमातींची आधार कार्ड, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड, किसान सन्मान निधी आणि इतर आवश्यक कागदपत्रे काढण्याची कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात आली आहे.

‘धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत’ जिल्ह्यातील अचलपूर, भातकुली, चांदूरबाजार, चिखलदरा, धारणी, दर्यापूर, धारणी, मोर्शी, वरुड या ९ तालुक्यांमधील ३२१ आदिवासीबहुल गावांचा समावेश आहे. या अभियानातून धारणी प्रकल्पांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळेत २ मुलांचे आणि मुळीचे ४ असे एकूण ६ वसतिगृहांना मंजुरी मिळाली आहे. या अभियानातून, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांच्यामार्फत आदिवासी लाभार्थ्यांना रस्ते, पाणी, वीज, नेटवर्क, पोषण, आरोग्य आणि विविध योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, आधार, रेशन, जात प्रमाणपत्र यातील त्रुटी शोधून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. भारत सरकारमार्फत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी १५ ते ३० जून २०२५ या कालावधीत ‘धरती आबा जनभागीदारी अभियान’ राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत माहिती, शिक्षण व संवादच्या मदतीने एकूण ३२१ गावांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. या कालावधीत सर्व लाभार्थ्यांना योजनांचा लाभ पोहोचविण्यात येणार आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून कोणताही लाभार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे. जिल्ह्यात आदिवासी व आदिम जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ थेट पोहोचवण्यासाठी जिल्हा प्रशासन सक्रियपणे कार्यरत आहे. ‘धरती आबा’ आणि ‘पीएम जनमन’ अभियानांतर्गत हे कार्य समन्वयाने राबवले जात आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम प्रभावीपणे राबवले जात आहेत. नागरिकांनी या शिबिरांना लाभ घ्यावा असे आवाहन प्रकल्प अधिकारी राहुल ठोंबरे यांनी केले आहे.


**पाहिजेत**

**अंत्योदय मिशन देवग्राम ता. नरखेड, जि.नागपूर**

संस्थेअंतर्गत कार्यरत विविध विभागांमध्ये विनाअनुदानित तत्त्वावर असलेली रिक्त पद भरती बाबत दिनांक 24/6/ 2025 ला मूळ कागदपत्रासह इच्छुक उमेदवारांनी दु. 12 वाजता उपस्थित राहावे.

| अ.क्रं. | पदनाम | अर्हता | अनुभव | संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | इंग्रजी | बी.ए.बी.एड. | 2 वर्षे | 1 |
| 2 | विज्ञान | बी.एस.सी.बी.एड. | 2 वर्षे | 1 |
| 3 | पूर्वमाध्यमिक शिक्षिका(इंग्रजी माध्यम) | मोन्टेसरी,डी.एड.किंवा तत्सम | - | 2 |
| 4 | गणित(माध्य) | बी.एस.सी.(गणित) | 2 वर्षे | 1 |
| 5 | चौकीदार | 10 वी पास | - | 1 |

स्थळ- कार्यालय
अंत्योदय मिशन देवग्राम
ता.नरखेड,जि.नागपूर.

संचालक
अंत्योदय मिशन देवग्राम,
ता.नरखेड,जि.नागपुर.

## संपादकीय

### गुणांचं कौतुक उशीरा होतं; पण होतं

# इराण व इस्त्राईल

जराणमधील ताज्या हल्ल्याची जबाबदारी 'आयसिस'ने घेतल्यावरही इराण म्हणतो की यामागे इस्त्रायलचा हात आहे. खुद्द इराणींचाही यावर विश्वास नाही. 'अ' हा 'ब'चा शत्रू, 'ब' आणि 'क' यांच्यातील नातेही वैरभावाचे. त्यात 'अ' आणि 'क' यांचेही नाते कटू आणि 'ड' हा या तिघांचाही शत्रू. असे काहीसे चित्र आज पश्चिम आशियाच्या आखातात दिसते. तेथील परिस्थिती गेल्या शतकातील साठ–सत्तरच्या दशकाप्रमाणे पुन्हा एकदा कमालीची गुंतागुंतीची होऊ लागली असून इराणमधील ताज्या दहशतवादी हल्ल्याने हा गुंता अधिकच वाढतो. या हल्ल्यात शंभरभर दगावले आणि दोन–एकशे जायबंदी झाले. गेल्या सुमारे पाच दशकांत इराणमध्ये इतका नृशंस दहशतवादी हल्ला झालेला नाही. या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी 'आयसिस' या दहशतवादी संघटनेने घेतली; पण इराणच्या मते यामागे इस्त्रायल आहे. इराणी सत्ताधारी धर्मगुरूच्या क्रांतिकारी सुरक्षा दलाची माध्यमशाखा असलेल्या 'तस्नीम वृत्त सेवा' या अधिकृत यंत्रणेने या संदर्भात इस्त्रायलवर असा आरोप केला. इराणचे अध्यक्ष इब्राहीम रेईसी यांनी तर थेट 'झायोनिस्ट' राजवटीस—म्हणजे इस्त्रायलला—'गंभीर परिणामांस' तोंड द्यावे लागेल असा इशारा दिला. इस्त्रायल यहुदी धर्मीय. आयसिस ही कट्टरपंथी इस्लामी संघटना. या दोघांत 'तसे' नातेसंबंध असण्याचे काहीच कारण नाही. तथापि इस्त्रायलचा इतिहास अशा अनेक व्यभिचारी संबंधांनी भरलेला आहे. गेल्या शतकात दशकभर चाललेले इराण–इराक युद्ध हे त्याचे एक उदाहरण. त्या वेळी अमेरिकेने इराण आणि इराक या दोन्ही युद्धखोरांस शस्त्रपुरवठा केला आणि इस्त्रायल त्यात मध्यस्थ होता. पण म्हणून इराणमधील ताज्या हल्ल्यामागे इस्त्रायलचा हात आहे असे काही म्हणता येणार नाही. तसा काही पुरावाही अद्याप नाही. गाझातील युद्ध, हुथी समुद्री चाच्यांचे उद्योग, येमेन–सीरिया आदी देशांतील अशांतता इत्यादींमुळे पश्चिम आशिया कमालीचा अशांत बनला असून या परिसरातील शांततेचे महत्त्व लक्षात घेता हा गुंता समजून घेणे आवश्यक ठरते. ताज्या दहशतवादी हल्ल्यात लक्ष्य ठरलेला इराण हा 'हमास' आणि 'हेझबोल्ला' या संघटनांचा पाठीराखा आहे. या दोन दहशतवादी संघटना आणि इस्त्रायल हा एकमेकांविरोधात गाझा संघर्षांत समोर उभे ठाकलेले आहेत. हे सुरू असताना मध्येच उपटलेल्या हुथी बंडखोरांचा आधारस्तंभही पुन्हा इराणच. हा देश शियापंथीय. किंबहुना शिया पंथीयांचे सर्वोच्च शक्तिस्थान म्हणजे इराण. पश्चिम आखाताचे नेतृत्व करण्याचे स्वप्न हा देश पाहतो. त्यास मोठे आव्हान आहे ते सौदी अरेबियाचे. हा तेलसंपन्न देश सुन्नी पंथीय. त्यात इस्लामला सर्वाधिक प्यारूया मक्का आणि मदिनेवर सौदीचेच नियंत्रण. या देशाची सूत्रे अनौपचारिकपणे का असेना महंमद बिन इब्न सलमान ऊर्फ 'एमबीएस' याच्या हाती आल्यापासून सौदी अरेबिया कमालीचा आक्रमक आणि हिंसकही झालेला दिसतो. वास्तविक एमबीएस अद्याप तरी राजपुत्र आहे; राजा नाही. पण विद्यमान सम्राटाच्या अनेक चिरंजीवांतील सर्वात लाडका उत्तराधिकारी असा त्याचा लौकिक. त्या अर्थाने आपण सम्राटपदी आरूढ झालोच, असे त्याचे वर्तन असते. त्याच्या या हडेलहप्पी वर्तनाची चुणूक येमेनमधील हुथी बंडखोरांविरोधात जेव्हा थेट 'एफ १६' डागण्याचा आदेश एमबीएसने दिला तेव्हा त्यातून आली. त्याच्या या कृत्याने एमबीएस आणि सौदीस ही विमाने देणारी पाठीराखी अमेरिकाही हादरली. येमेनमधील त्याच्या या आततायी प्रतिहल्ल्यापासून इराणने हुथी बंडखोरांची रसद वाढवली आणि त्या देशाचे सौदीबरोबरचे संबंध आणखी चिघळले. त्यात ढासळत्या इराण–अमेरिका संबंधांची भर पडली. इराणचे सत्ताधीश धर्मवादी आहेत आणि अमेरिकेस जुमानण्यास ते तयार नाहीत. या इराणींना माजी अमेरिकी अध्यक्ष बराक ओबामा यांनी शांत करून कराराच्या जाळ्यात ओढण्याचा मुत्सद्दीपणा दाखवला होता. पण नंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी आपला जावई जेरेड कुशनेर याच्या सौदी आणि इस्त्रायली हितसंबंधांपोटी इराणला पुन्हा दुखावले. हे कुशनेर यहुदी– म्हणजे ज्यू – आहेत आणि त्यांचे इस्त्रायली नातेसंबंधही सर्वश्रुत आहेत. या सगळ्यातून इराण पुन्हा संघर्षांच्या भूमिकेत गेला आणि अमेरिकेने त्यावर आर्थिक निर्बंध लादल्याने त्या देशाची आर्थिक स्थिती चांगलीच चिघळली. आर्थिक संकटात आलेला कोणताही नेता करतो तेच मग इराणी नेतृत्वाने केले. त्या देशाचे धर्मवादी असलेले नेतृत्व अधिकच कट्टर धर्मवादी बनले. या मुद्द्यावर इराणबाबत बरे बोलण्यासारखे काहीही नाही. त्या देशांतील महिलांविरोधात इराण शासकांच्या भूमिकेची निंदा करावी तितकी कमीच असेल. देशांतर्गत समस्यांवर गांजलेले आणि ग्रासलेले नेते नेहमीच परकीयांस बोल लावतात. इराणच्या राजवटीचे तसे झाले आहे.

**सुविचार** "आपल्या समाजातील समस्यांची समज घेणे ही विश्वात्मक दृष्टिकोन वाचणे आणि चर्चा करणे महत्त्वाचे आहे."

# राजमाता माँसाहेब जिजाऊ यांचे जीवन व कार्य

राजघराण्याच्या थोर राजमाता, शिवरायांच्या विवेकी वीरमाता, शिवराय व संभाजींच्या मार्गदाता, धैर्यशील व न्यायप्रिय राजमाता, एका महान थोरपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या मातोश्री, एक शूर वीरांगना, एक प्रेरणादायी नेतृत्वकर्ती, एक आदर्श राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या दि.१७ जून २०२५ ला असलेल्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन॥

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा जन्म इ.स.१५९८ सालातील जानेवारी मासाच्या १२ तारखेला बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला. देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज असलेल्या लखुजी जाधव यांच्या त्या लाडक्या सुकन्या होत्या. त्यांचे बालपण निसर्गरम्य आणि शांत वातावरणात गेले. जिजाबाईंना कुटुंबामधून लहानपणापासूनच धार्मिक संस्कार मिळाले आणि त्यांना शस्त्रास्त्रांचेही प्रशिक्षण देण्यात आले. त्याचा उपयोग पुढे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविण्यात केला. शहाजीराजे भोसले यांच्याशी तत्कालीन काळातील प्रथेनुसार लहान वयातच त्यांचा मंगल विवाह संपन्न झाला. शहाजी राजे भोसले हे एक शूर वीर, महत्वाकांक्षी आणि पराक्रमी योद्धा होते.जिजाऊंनी त्यांच्या पतीला नेहमीच प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या कार्यात सहभागी झाल्या. जिजाबाईंना संभाजी व शिवराय असे दोन पुत्र होते. थोरले पुत्र संभाजी हे



शहाजी राजांच्या जवळ बंगरुळ येथे होते.त्यांचा कनकगिरीच्या युद्धात १६५४ मध्ये मृत्यू झाला होता. शिवरायांचे बालपण सुसंस्कार देऊन काळजीपूर्वक घडविले.

छत्रपती शिवरायांना लहानपणापासूनच मातोश्री जिजाऊंनी सर्वच बाबतीततरबेज करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शिवरायांना शूर, धार्मिक आणि देशभक्त तर केलेच शिवाय पुढे छत्रपती शिवाजी महाराजांची जनकल्याणकारी, प्रजाहितदक्ष सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते, स्वराज्यातील स्त्रियांचा पूर्णपणे सन्मान करणारे अशा प्रकारची जी ओळख निर्माण झाली ती जिजाऊंनी त्यांच्यावर केलेल्या संस्कारामुळेच. त्यांनी शिवरायांना इतिहास,राजकारण आणि युद्धकला यांचे शिक्षण दिले. शिवाजी महाराजांच्या खऱ्या मार्गदर्शक आणि गुरु मातोश्री राजमाता जिजाऊ माँसाहेब होत्या. प्रभावशाली व्यक्तिमत्त्व असलेल्या जिजामाता त्यांच्यातील धैर्य, शूरता, आत्मविश्वास आणि दृढ निश्चय या गुणांमुळे त्यांनी शिवरायांना एक महान शासक आणि जनकल्याणकारी राजा बनविले.

जिजाबाई शहाजीराजे भोसले यांचे मातोश्री ते राजमाता या भूमिकेतून केलेले महान कार्य प्रत्येक भारतीय महिलांसाठी प्रेरणास्थान असून ही प्रेरणा स्वत:मध्ये निर्माण करण्यासाठी प्रत्येकाच्या घरात जिजाऊंचे चरित्र,त्यांच्या जीवन व कार्यावरील पुस्तकं असणे आवश्यकच आहे. जिजाऊ माँसाहेबांचा जन्म सिंदखेडराजा येथील ज्या भुईकोट राजवाड्यामध्ये झाला. या राजवाड्याला आकर्षक भव्य प्रवेशद्वार आहे. या राजवाड्या समोर आज नगरपालिका निर्मित एक सुंदर बगीचा देखील आहे. याच ठिकाणी राजे लखुजीराव जाधवांचे समाधीस्थळ आहे.

या स्थळी असलेल्या रंगमहाला मध्ये जिजाऊंनी रंग खेळला होता. या रंगमहालातच शहाजीराजे आणि जिजाऊंच्या विवाहाची बोलणी करण्यात आली होती तोच हा रंगमहाल होय.

जिजाऊंनी शिवाजी महाराजांना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत बनवण्यासाठी कठोर असे प्रशिक्षण दिले. त्यांनी शिवाजी महाराजांना घोडेस्वारी, तलवारबाजी आणि युद्धकला याचे शिक्षण दिले. जिजाऊंनी शिवबांना स्वराज्याची स्थापना करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांनी शिवाजी महाराजांना राजकीय आणि लष्करी रणनीतींचे ज्ञान दिले.जिजाऊ स्वत: एक मजबूत, निर्भिड, आदर्श महिला होत्या. त्यांनी स्वराज्यातील महिलांना सर्व बाबतीत सशक्त करण्यासाठी महिलांच्या सशक्तीकरणावर खूप मोठा भर दिला होता. जिजाऊंनी महिलांना शिक्षण आणि स्वातंत्र्य देण्यासाठी खूप प्रयत्न केले. राजमाता जिजाऊंना समाजामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणायचा होता. त्यासाठी त्या सतत प्रयत्नशील होत्या. एक महान समाजसुधारकाच्या अंगी जे गुण असायला हवे होते ते सर्व गुण राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्यात होते. त्यांनी समाजातील वृद्धिंगत होत असलेली अंधश्रद्धा आणि कुप्रथांविरुद्ध आचरणातून लढा दिला. त्या काळात शिक्षण मुख्यत: घरातच दिल्या जात असे. छ.शिवाजी महाराजांना जिजामातेने दिलेल्या शिक्षणाचा विचार केला तर त्यांनी शिक्षणाबाबत महत्व पूर्ण जाणीव शिवबांना करुन दिली होती. जिजामातेने शिवाजी महाराजांना राजकारण, धर्म, इतिहास, युद्धकला यासह विविध विषयांचे ज्ञान दिले. त्यांनी शिवाजी महाराजांना धैर्य, शौर्य, न्याय आणि स्वराज्याची भावना या गुणांचे महत्त्व शिकवले. जिजाऊंनी छ.शिवाजी महाराजांना संत आणि ज्ञानी व्यक्तींच्या संपर्कात आणले होते. यामुळे शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होत गेले व त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडत गेले. मातोश्री जिजाऊंनी छ.शिवाजी महाराजांच्या मनात स्वराज्याची भावना रुजविली. त्यांनी शिवाजी महाराजांना शिकवले की, स्वराज्य मिळवण्यासाठी शिक्षण आणि ज्ञान आवश्यक आहे.

त्यांनी शिवाजी महाराजांना शिकवले की, शिक्षणामुळेच समाजाचा विकास होऊन समाज मजबूत होऊ शकतो, समाजाचा विकास होऊ शकतो. त्यांनी शिवाजी महाराजांना एक महान शासक बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि त्यांच्यामुळेच हिंदवी साम्राज्य निर्माण होऊ शकले.

जिजाऊंचे हिंदवी स्वराज्य स्थापनेबाबतचे,हिंदवी स्वराज्यातील जनकल्याणाचे, छत्रपती शिवाजी महाराजांना घडविण्याचे,तत्कालीन समाजात सुधारणा करण्याचे योगदान भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करुन महाराष्ट्राला गौरव प्राप्त करून दिला तो राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या प्रेरणेमुळेच. अशा राजघराण्याच्या राजमाता, मायाळू ममत्व, कणखर तन – मृदू कोमल मन असलेल्या, स्वराज्यातील सर्व भेद संपवून समतेचे राज्य निर्माण करणाऱ्या, स्वराज्याला बंधुतेचा साज चढविणाऱ्या प्रजाहितदक्ष राष्ट्रमाता, रयतेचे राजे– तज्ज्ञ प्रशासक – स्वराज्याचे रक्षक छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या स्मृतिदिना निमित्त विनम्र अभिवादन॥

**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले**
अमरावती.८०८७७४८६०९
समता गौरव पुरस्कार प्राप्त

# शाळा सुरक्षा करण्यासाठी

पुण्यातील एका शाळेत काही विद्यार्थ्यांनी एका विद्यार्थ्यावर केलेल्या लैंगिक अत्याचाराची पोस्ट व्हायरल झाली आणि लाखो पालक धास्तावले. ही काही पहिलीच घटना नाही. सातत्याने कोणत्या ना कोणत्या शाळेत अशा घटना घडत असतात. यास शाळेसह सर्वच जबाबदार असतात. त्यामुळे कोणा एका व्यक्तीला, यंत्रणेला दोष न देता शिक्षक, शालेय व्यवस्थापन, पालक आणि विद्यार्थी मिळून काम करणे गरजेचे वाटते. बाल लैंगिक अत्याचार म्हणजे कोणत्याही १८ वर्षांखालील बालकावर कोणत्याही व्यक्तीने लैंगिक अत्याचार करणे. इथे 'कोणतीही व्यक्ती' यात पुरुष, स्त्री तसेच १८ वर्षांखालील मुलेही आली. शाळेतील शिक्षकांकडून लैंगिक अत्याचार घडल्याच्या हजारो घटना उघडकीस आल्या असून काही प्रकरणांत शिक्षकांना शिक्षा झाल्या. मात्र, अनेक घटनांमध्ये विद्यार्थ्यांकडून दुसऱ्या विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याची उदाहरणे कानावर येतात. यात एखाद्या मुलीच्या किंवा मुलाच्या नावावरून चिडवणे, छेडछाड, दादागिरी किंवा धमकी देऊन गैरवर्तन, लाजिरवाणे कृत्य करून त्रास देणे, लैंगिक अवयवांबद्दल



अश्लील शेरे, विशिष्ट हावभाव, चिठ्या तसेच बाके, स्वच्छतागृहांत नावे लिहिणे, बदाम, बाण, लैंगिक अवयवांची चित्र काढणे, तशा अनुषंगाने शब्द लिहिणे असे या छळाचे असंख्य प्रकार असतात. किशोरवयीन मुलांमध्ये लैंगिक कृत्याबाबत सांकेतिक भाषेत चर्चा होतात. विद्यार्थ्यांना लैंगिक कृती करण्यासाठी विचारणा केली जाते. चिडवले जाते. अनेकदा मौजमजा समजून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. यात काही घटना खूपच तीव्र असतात, तर काही कुणाच्याही तक्रार येईपर्यंत लक्षात येत नाहीत. अनेकदा शाळा 'आमचा काही संबंध नाही' असे म्हणून हात वर करतात. 'जाऊ द्या हो, लहान मुलेच आहेत, त्यांना अजून कळत नाही, मुलांकडून उत्सुकतेपोटी घडले..' आदी करणे देत दुर्लक्ष करण्याचा सल्ला दिला जातो. अनेकदा दबाव आणला जातो.

अशा घटनांचे विश्लेषण केले असता पहिले कारण समोर येते ते म्हणजे किशोरवयीन टप्पा. विरुद्ध लिंगी आकर्षण ही नैसर्गिक बाब आहे. यातून नकळत्या वयातील प्रेम आणि आकर्षण निर्माण होऊन प्रेमिकांच्या जोड्या होतात आणि लैंगिक संबंध घडतात. हे केवळ दोन व्यक्तींपुरते मर्यादित असते असे नाही, तर ही घटना इतरांना कळल्यावर त्याचा गैरफायदा घेत असे अत्याचार केले जातात. एक मुलीवर तिच्या प्रेमिक मुलाव्यतिरिक्त त्याचे मित्र लैंगिक अत्याचार करतात, अशा घटना घडतात. दुसरे कारण म्हणजे मोठ्या माणसांच्या लैंगिक संबंधाच्या घटना बघितल्या, की उत्सुकतेपोटी याचे प्रयोग केले जातात. अनेकदा तर हा खेळ म्हणून खेळला जातो. मुलांकडून या खेळास विशिष्ट नावे दिली जातात. आधी उत्सुकता आणि नंतर ती सवय होते. आपली मुले असा काही खेळ खेळत असतील, हे पालकांच्या मनातही येत नाही. तिसरे कारण म्हणजे, ज्यावर सगळेच नुसती चर्चा करतात. ते कारण म्हणजे मुलांच्या हातातला स्मार्टफोन आणि त्यावरील पॉर्न व्हिडिओ. सध्या अगणित पोर्न व्हिडिओ बघितले जातात आणि त्याचे प्रयोग इतरांवर केले जातात. हे प्रयोग कधी संमतीने तर कधी असे व्हिडिओ बघून होतात. चौथे कारण म्हणजे एखाद्या विद्यार्थ्याला धडा शिकवण्यासाठी किंवा त्याची टर उडविण्यासाठी अशा घटना घडतात. किशोरवयीन मुलांची भांडणे शिक्षकांसाठी नवी नसतात. परंतु ती काही वेळा लैंगिक अत्याचारांकडे झुकतात. म्हणून यावर वेळीच लगाम घालणे गरजेचे असते.

उपचारांपेक्षा खबरदारी चांगली या तत्त्वानुसार शाळांनी अशा घटना घडू नये म्हणून शालेय पातळीवर शिक्षक, पालक, व्यवस्थापनाने बाल हक्क संरक्षण धोरणे आखायला हवीत. प्रत्येक शाळेने स्वत:चे धोरण जाहीर करून त्यानुसार काम करावे. विद्यार्थी तसेच शिक्षक, शाळेचे काळजीवाहक मामा–मावशी, रिक्षा किंवा बसचालक, वाहक अशा साऱ्यांचे कार्यशाळा, व्याख्याने व इतर उपक्रमांतून प्रबोधन आवश्यक असते. लैंगिक शिक्षणाचे अनेक उपक्रम शाळा करतात. मात्र ते केवळ 'गुड टच बॅड टच' आणि मासिक पाळी इतकेच मर्यादित असतात. त्यापुढे जाऊन लैंगिक शिक्षण आवश्यक आहे. अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षण येऊन दोन दशके लोटली. परंतु त्याकडे सगळे केवळ अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून बघतात. ज्या विषयाचे मुलांना कुतूहल वाटते तो विषय असा दुर्लक्षित का केला जातो? 'केवळ समाज निषिद्ध विषय' हेच याचे एकमेव उत्तर आहे. मोठ्या व्यक्तींकडून होणाऱ्या अत्याचारात वासना हे मुख्य कारण असते. तर किशोरवयीन लैंगिक घटनांमध्ये मुख्य कारण नैसर्गिक आहे. आकर्षण आणि उत्सुकतेतून या घटना घडतात. म्हणून या विषयाकडे व्यापकतेने बघण्याची गरज आहे. लैंगिक शिक्षण हा विषय व्यापकपणे विद्यार्थांमध्ये पोचवायला हवा. लैंगिक संबंधातून निर्माण होणारे शारीरिक, सामाजिक, मानसिक परिणाम, तसेच बाल लैंगिक अत्याचारांविषयी मार्गदर्शन करायला हवे. शॉर्ट फिल्म्स, पपेट शो अशा माध्यमांतून संवाद साधायला हवा. याचबरोबर शाळांमध्ये सर्व वर्गांत सीसी टीव्ही असावेत. तक्रार पेटी, तक्रार समिती यांचा सक्षम वापर व्हायला हवा.

मुख्य म्हणजे शाळांनी अशा प्रकारांची त्वरित दखल घेऊन त्याची माहिती पोलिस, चाईल्ड लाईन, बाल कल्याण समिती यांना द्यावी. लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ च्या कलम १९ नुसार अत्याचाराची माहिती पोलिसांना न देणे हा गुन्हा असतो. पोलिस, न्यायालय या प्रक्रियेपासून दूर राहण्याच्या उद्देशाने शाळा किंवा शिक्षक अशा घटनांची माहिती देत नाहीत. हे योग्य नाही. चाईल्ड लाईन क्रमांक १०९८ ला फोन करुन ही माहिती देता येते.

वरुड दर्पण हे दैनिक पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून दैनिक वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# शासकीय तंत्रनिकेतनच्या २६७ विद्यार्थ्यांना रोजगार

## विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य उपलब्ध

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – शासकीय तंत्रनिकेतनमध्ये विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन दिले आहे. उत्कृष्ट अध्यापन आणि इतर सोयी सुविधांमुळे गेल्या २०२४–२५ या वर्षात उत्तीर्ण झालेल्या २६७ विद्यार्थ्यांना नामांकीत कंपनीत रोजगार मिळाला आहे.

अमरावती शासकीय तंत्रनिकेतन अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेची स्थापना १९५५ मध्ये झाली आहे. तसेच संस्थेला १९९५ मध्ये शैक्षणिक स्वायत्तता लाभली आहे. संस्थेत स्थापत्य, यंत्र, विद्युत, अणू विद्युत, संगणक, माहिती तंत्रज्ञान, औषध निर्माण शास्त्र, प्लास्टिक पॉलिमर, रसायन या ९ विद्याशाखा असून त्यापैकी ६ एनबीए नामांकन प्राप्त आहेत.

संस्थेचा ६२ एकराचा परिसर असून इमारती, प्रशस्त क्रीडांगणे, तसेच अद्ययावत पुस्तकांनी परिपूर्ण असे सुसज्ज ग्रंथालय आहे. प्रयोगशाळा अत्याधुनिक उपकरणे, यंत्रसामुग्री, रसायने यांनी परिपूर्ण आहेत. संस्थेत उच्चविद्या




विभूषित व अनुभवी प्राध्यापक वर्ग आहे. तसेच मुलांसाठी एक आणि विद्यार्थिनींसाठी दोन वसतिगृह, इंटरनेट व इतर सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम असून दरवर्षी दर्जेदार कंपनीमध्ये मुलाखतीद्वारे बहुसंख्य विद्यार्थ्यांची निवड केली जाते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पॅकेज दिल्या जाते. २०२४–२५ या शैक्षणिक वर्षांत आता पर्यंत एकूण २६७ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यामध्ये निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पॅकेज देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना नामांकीत कंपनीमध्ये निवड होण्याची संधी मिळते. तसेच संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना मुलाखतपूर्व मार्गदर्शन आणि रोजगार संधी उपलब्ध व्हावी म्हणून कार्यक्षम प्रशिक्षण व आस्थापना विभाग उपलब्ध आहे. संस्थेत नोंदणीकृत माजी विद्यार्थी संघटना सक्रीय आहे. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून विविध नामांकीत कंपन्यांमध्ये वरीष्ठ पदावर कार्यरत माजी विद्यार्थीसुद्धा संस्थेतील विद्यार्थ्यांना रोजगारासाठी प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांच्या आर्थिक विकासासाठी मोलाचे सहकार्य करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पाठ्यक्रम संस्थेत लागू केला आहे. द्विभाषिक शिक्षण प्रणाली अवलंब केली आहे. तंत्रनिकेतनमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना अत्यंत अल्प शुल्क आकारुन शिक्षण पूर्ण करण्याची संधी तसेच शिक्षण व परीक्षा शुल्क सवलत दिली जाते. गरीब व पात्र विद्यार्थ्यांसाठी संस्थेकडून ‘नैवेद्य निधी’ योजनेतून आर्थिक मदत दिली जाते. भारत सरकार आणि राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ दिला जातो. राज्य सरकारच्या योजनेंतर्गत मुलींना १०० टक्के शुल्क माफ केले आहे. विद्यार्थ्यांसाठी उल्लेखनीय सुविधा संस्थेत उपलब्ध आहेत. राज्य शासनाने संस्थेला नुकतेच सेंटर ऑफ एक्सलन्स, इंटरनेट ऑफ थिंग्स आणि थ्रीडी प्रिंटिंग या सुविधा दिली आहे. याचा संस्थेतील सर्व विभागातील विद्यार्थी उपयोग घेत आहेत. नवीन तंत्रज्ञानावर विकसित असलेले सर्व मॉडेल्स वापरून विद्यार्थी नवीन प्रोजेक्ट तयार करत आहेत. जेणेकरुन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी चांगल्या प्रकारे उपलब्ध होतील. राज्य शासनाच्या सीईटी सेलद्वारे नवीन २०० संगणक असलेले सुसज्ज असे दोन संगणक कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या आभासी पद्धतीने ऑनलाईन परीक्षा घेण्यात येतात. तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाइनच्या माध्यमातून ई–बुक्सद्वारे अभ्यास साहित्य डाऊनलोड करता येते. तसेच संस्था आणि विभागांतर्गत विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या ऑनलाइन परीक्षा घेण्यात येतात. जिल्हा नियोजन समितीमधून संस्थेच्या सर्व विभागांना २२ स्मार्ट क्लासरुम देण्यात आले आहे. याचा फायदा प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना शिकवणी आणि प्रशिक्षण घेण्यासाठी होत आहे. मेडा कडून १४० केव्ही सौर ऊर्जा रुफ टॉप पॅनल विकसित करण्यात येत आहे. अद्ययावत सोयी सुविधा, दर्जेदार शिक्षण, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेली शिक्षण प्रणालीयुक्त असलेली शासकीय तंत्र निकेतन ही संस्था उत्कृष्ट अभियंता व औषधनिर्माणशास्त्रज्ञ घडविण्यात अग्रेसर आहे. तंत्रनिकेतनची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य डॉ.अतुल बोराडे यांनी केले आहे.

# निम्न पेढी प्रकल्प बाधीतांना १०१ कोटीचे सानुग्रह अनुदान मंजूर

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

### पहिला टप्प्यात ५७.५० कोटी रुपये प्राप्त

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्ह्यातील दुसरा मोठा प्रकल्प असलेल्या निम्न पेढी प्रकल्पातील बाधितांना १०१ कोटींचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. यातील पहिल्या टप्प्यात ५७ कोटी ५० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने निधी प्राप्त झाला असून त्याचे वाटप होणार लवकरच होणार आहे. यामुळे प्रकल्पाच्या कामाला गती येणार आहे.

निम्न पेढी प्रकल्पातील पाच गावांच्या पुनर्वसनाला गती देण्यात आली आहे. या गावातील नागरिकांना हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह निधी मिळावा यासाठी गेल्या दहा वर्षांपासून आंदोलने झाली. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याप्रकरणी दखल घेत तातडीने याबाबत बैठक आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या सहमतीने निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांना पाच लाख रुपयाचे सानुग्रह अनुदान मंजूर करुन प्रकल्पाची वाट मोकळी करुन दिली आहे.



सानुग्रह निधी ५ गावातील ८४५ लाभार्थ्यांना मिळणार आहे. सध्या या प्रकल्पाला १०१ कोटी रुपये मंजूर झाले असून ५७.५० कोटी रुपयांचा निधी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेला आहे. निम्न पेढी प्रकल्पांतर्गत २००६–१३ या कालावधीत सरळ खरेदी प्रक्रियेत एकूण १ हजार ९८१ हेक्टर शेतजमीन संपादित करण्यात आली आहे. संपादित शेतजमीनीकरीता पाच लाख रुपये प्रति एकर सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आली. याबाबत महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने यासंदर्भात अनेक बैठका घेण्यात आल्या. या बैठकीदरम्यान निम्न पेढी प्रकल्पात सुमारे १०१ कोटी रूपयांचा सानुग्रह निधी प्राप्त झाला आहे. प्रथम टप्प्यात प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील हातुर्णा, अळनगाव, गोपगव्हाण, कुंड खुर्द व कुंड सर्जापूर या ५ पुनर्वसित गावासाठी ५७.५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यामुळे आता निम्न पेढी प्रकल्पाला गती येणार आहे. अमरावती, भातकुली व मूर्तिजापूर तालुक्यातील गावांना निम्न पेढी प्रकल्पाचा लाभ होणार आहे. या प्रकल्पात सुमो ३ हजार २०० हेक्टर क्षेत्र बुडीत राहणार आहे.

या प्रकल्पामुळे ३ तालुक्यासह जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. भातकुली तालुक्यातील पाणीटंचाई दूर होऊन प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे सोयाबीन, कापूस, तूर, तसेच भाजीपाला पिकांना फायदा होणार आहे. सानुग्रह निधीपोटी मिळालेला ५७.५० कोटी रुपयांचा निधी प्रशासकीय बाबी पूर्ण करुन वितरीत करण्यात येणार आहे. सदर निधी पालकमंत्री बावनकुळे यांच्या पुढाकाराने प्राप्त झाला आहे. सानुग्रह अनुदान वितरीत करण्याची कारवाई जलसंपदा विभागातर्फे करण्यात येणार आहे. प्रकल्पग्रस्तांनी तातडीने पुनर्वसीत गावात स्थलांतरण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागात

# आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन उत्साहात साजरा

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नागपूर** – येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व्दारा संचालित शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या दिनानिमित्त विभागा मार्फत आंतरविद्यापीठीय इ–क्विझ प्रश्नमंजुषा स्पर्धा आभासी पद्धतीने साजरी करण्यात आली.

या उपक्रमासाठी प्रा.डॉ.ओ.एस.देशमुख यांनी परवानगी व पाठबळ दिले. स्पर्धेच्या संयोजिका वनस्पतिशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ.शरयू एस.देशमुख यांनी स्पर्धेचे नियम व अटी सांगत सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धे विषयी




सविस्तर माहिती या ई–स्पर्धेत पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, लाखणी व वर्धा येथील विविध महाविद्यालय तसेच वेगवेगळ्या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या एकूण ११७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला व पर्यावरण जागृतीसाठी आपले योगदान दिले. सहभागानंतर विद्यार्थ्यांना फीडबॅक लिंक द्वारे इ–सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले. विभाग प्रमुख डॉ.रुपाली महाखोडे यांनी विद्यार्थ्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन केले तसेच विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पर्यावरण रक्षणाचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी वाढत्या प्लास्टिक प्रदूषणामुळे होणाऱ्या दुष्परिणामांवर विचार मांडले तसेच प्लास्टिक प्रदूषण या संकल्पनेवर भाष्यकरत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाची गरज अधोरेखित केली. वृक्षारोपणा बाबत प्रा.डॉ.ओमराज देशमुख यांनी मार्गदर्शन केले. प्रश्नमंजुषा उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख व सर्वसहकारी प्राध्यापकांचे विशेष कौतुक केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात डॉ.अनिता काटगये, डॉ.रेश्मापी सोनवलकर, पियुष शर्मा, तसेच प्रयोगशाळा सहाय्यक प्रशांत, शुभम व अनिकेत यांचे सहकार्य लाभले.

या स्पर्धेचे आयोजन डॉ.शरयू एस. देशमुख यांनी संपूर्ण नेटकेपणाने व आभासी पद्धतीने यशस्विरित्या पार पाडले. विजेत्या विद्यार्थ्यांना इ–सर्टिफिकेट देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती, प्लास्टिक मुक्ती, व हरित भविष्य या संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न केला गेला. अशा उपक्रमांद्वारे पर्यावरण प्रेमी पिढी घडविण्याच्या दिशेने अशा उपक्रमाद्वारे पर्यावरण प्रेमी पिढी घडविण्याच्या दिशेने वनस्पति शास्त्र विभागाचे हे एक महत्वाचे पाऊल आहे.

# विभागाने द्वारपोच चिकित्सा सेवा द्यावी : मंत्री पंकजा मुंडे

### गोशाळा नोंदणीचे प्रमाणपत्र वाटप

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – शासनाच्या प्रयत्नाने शेतकऱ्यांचा पशू पालनाकडे कल वाढत आहे. पशूसंवर्धन विभागाने या पशूंच्या आरोग्याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासल्यास विभागाने पशूंच्या चिकित्सेसाठी द्वारपोच सेवा द्यावी, असे निर्देश पशूसंवर्धन व पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

आज पशूसंवर्धन विभागाचा आढावा घेण्यात आला. यावेळी पशू संवर्धन विभागाचे डॉ.वाय. एस. वंजारी, डॉ.शशिकांत कानफाडे, डॉ.संदिप इंगळे, डॉ.शिवेंद्र महल्ले, डॉ.सुधीर चौधर, डॉ.राजेंद्र पेठे, डॉ.दिलीप देशमुख आदी उपस्थित होते.



पंकजा मुंडे म्हणाल्या, पशूंच्या आरोग्याची चांगल्या पद्धतीने काळजी घ्यावी. जिल्ह्यात प्रयोगशाळा आणि चिकित्सागृह असावेत, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

प्रामुख्याने तालुकास्तरावर घरपोच सेवा देण्यात यावी. गोशाळांमध्ये चांगल्या दर्जाच्या सुविधा असाव्यात. गोशाळेला तारेचे कुंपण घालण्यात यावे. याठिकाणी दाखल होणाऱ्या पशूंना योग्य उपचार करण्यात यावे. देशी गाय परिपोषण योजनेतून तीन हजारावर गायींना अनुदान देण्यात आले आहे. त्यासोबच मानव विकासमधून दुधाळ जनावरे वाटप आणि प्रशिक्षण देण्यात येत आहे. या वाटप करण्यात आलेल्या जनावरांची माहिती ठेवावी. तसेच त्यांना आवश्यक असलेली मदत पुरविण्यात यावी. दुधाळ जनावरांना वैरणाची आवश्यकता असल्याने वैरण विकास कार्यक्रमामधून कामे घेऊन चाऱ्याची व्यवस्था करण्यात यावी. महामेष योजनेतून २१७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. यावर विशेष लक्ष ठेवण्यात यावे. यावेळी मुंडे यांच्या हस्ते गोशाळा नोंदणीचे प्रमाणपत्र प्राधिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले.

यानंतर त्यांनी पर्यावरण विभागाचा आढावा घेतला. महानगरपालिका क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या यंत्रणेची कार्यक्षमपणे हाताळणी करावी. प्रामुख्याने नागरी क्षेत्रात पाण्यावर प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी संबंधित यंत्रणेला सूचविण्यात यावे. विभागातील सांडपाणी प्रक्रियेसाठी लागणारे पाणी गोळा करण्यासाठी संबंधित पालिकांना व्यवस्था करण्यास सांगावे.

उद्योग क्षेत्रात वायू आणि जलप्रदूषणाच्या तक्रारी येतात. या तक्रारींची तातडीने दखल घेऊन त्याबाबत उपाययोजना करण्यास प्रकल्पांना सांगावे. अमरावतीमध्ये वस्त्रोद्योग आहे. त्याठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा तपासण्यात यावी. वीज निर्मिती केंद्रामधून वायू प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी येतात. त्यामुळे प्रकल्पामधून निघणारी राख आणि सांडपाण्याचे नियोजन करावे, असे निर्देश श्रीमती मुंडे यांनी दिले.

# बडगुजर-सलीम कुत्ताच्या फोटोवरुन रान उठवलं, आता भाजप प्रवेशावर नितेश राणे म्हणतात, येत असतील तर हरकत नाही

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ठाकरे गटाचे नाशिकमधील माजी सामर्थ्यशाली नेते सुधाकर बडगुजर हे मंगळवारी दुपारी मुंबईत भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा आहेत. त्यांच्या






भाजप पक्षप्रवेशाबाबत काहीसा संभ्रम असला तरी सुधाकर बडगुजर आणि त्यांचे कार्यकर्ते आज भाजपमध्ये प्रवेश करण्यावर ठाम आहेत.

सुधाकर बडगुजर ठाकरे गटात असताना भाजपकडून त्यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. सुधाकर बडगुजर आणि अंडरवर्ल्ड डॉन सलीम कुत्ता यांचा एका पार्टीतील एकत्र डान्स करतानाचे फोटो समोर आले होते. भाजप आमदार नितेश राणे यांनी त्यावेळी विधानसभेत हे फोटो दाखवत सभागृह डोक्यावर घेतले होते. त्यावेळी तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी केली जाईल, अशी घोषणाही केली होती. मात्र, आता सुधाकर बडगुजर यांच्या भाजप प्रवेशावर शिक्कामोर्तब होताच भाजप नेत्यांची भाषा १८० अंशांच्या कोनात बदलेली दिसत आहे. आक्रमक शैलीत विरोधकांचे लचके तोडणाऱ्या नितेश राणे यांनीही सुधाकर बडगुजर यांच्या भाजपमधील प्रवेशाचे स्वागत केले आहे. ते मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. हिंदुत्त्वाचा धागा घेऊन आमच्यासोबत कोणीही येत असेल तर आम्ही त्याचे स्वागतच करणार.

# गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांचे 'इस्त्रो'ला ऐतिहासिक उड्डाण

## मुख्यमंत्र्यांकडून विमानतळावर विद्यार्थ्यांना शुभेच्छा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**गडचिरोली** – गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलग्रस्त भागातील आणि आर्थिक मागास कुटुंबांमधील विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. समाज कल्याण विभागाच्या सिरोंचा, वांगेपल्ली (अहेरी) आणि नवेगाव (गडचिरोली) येथील निवासी शाळांमधील १२० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विमानप्रवासाद्वारे बंगळूरु येथील इस्त्रो केंद्राला भेट देण्यासाठी उड्डाण केले. विशेष म्हणजे, यातील अनेक विद्यार्थ्यांनी यापूर्वी साधी रेल्वेही पाहिली नव्हती, किंवा जिल्ह्याचे मुख्यालयही पाहिले नव्हते. त्यांच्या या स्वप्नवत प्रवासाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर येथे उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत ते कुठे जात आहेत, कसे जाणार आहेत आणि काय पाहणार आहेत, असे आपुलकीने विचारले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत 'मुलांनो, खूप खूप अभ्यास करा आणि यशस्वी व्हा', या शब्दात प्रेरित केले.



### आदिवासी विकास मंत्री आणि इतर मान्यवरांकडूनही शुभेच्छा

आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके आणि गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ.सिद्धार्थ गायकवाड यांनीही विमानतळावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### डॉ.सचिन मडावी यांच्या संकल्पनेतून साकारली योजना

या अभिनव उपक्रमाची संकल्पना सहाय्यक आयुक्त (समाजकल्याण) डॉ.सचिन मडावी यांनी मांडली होती. जिल्हाधिकारी पंडा यांनी त्यास तत्काळ मंजुरी दिली. तसेच पालकमंत्री देवेंद्र फडणवीस व सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांनी या योजनेसाठी निधी मंजूर केला. तत्पुर्वी गडचिरोली येथून या विद्यार्थ्यांना बसद्वारे हिरवी झेंडी दाखवून नागपूर विमानतळावर रवाना करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सुर्यवंशी, प्रकल्प अधिकारी चेतन हीवंज या प्रसंगी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील या अविस्मरणीय क्षणाला त्यांच्या पालकांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू पाहायला मिळाले.

### इस्त्रो

भारतीय अवकाश संशोधन संस्था ही भारत सरकारची राष्ट्रीय अवकाश संस्था असून, उपग्रह, रॉकेट आणि अवकाश तंत्रज्ञान विकासासाठी कार्यरत आहे. जगभरात भारतीय अंतराळ प्रगतीचे प्रतीक म्हणून इस्त्रो ची ओळख आहे.

# धामणगावरेल्वे येथील विद्यार्थी संगीत परीक्षेत उत्तीर्ण

## अभिजात कलोपासक मंडळाचा स्तुत्य उपक्रम

(संतोष वाघमारे)

*धामणगावरेल्वे* – खिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई तर्फे आयोजित विविध संगीत परीक्षेत धामणगावातील अभिजात संगीत कलोपासक मंडळाचा निकाल १०० टक्के जाहीर झाला आहे. भारतीय शास्त्रीय संगीत शिकण्याची आवड असणाऱ्यांसाठी धामणगाव येथील अभिजात संगीत कलोपासक मंडळ वरदान ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून संगीत, गायन, वादन क्षेत्रात विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले असून चित्रपट सृष्टीत सुद्धा संगीतकार म्हणून नामांकन मिळविले आहे. अभिजात संगीत कलोपासक मंडळातर्फे या वर्षी सेवाग्राम परीक्षा केंद्रावरुन ४८ विद्यार्थ्यांनी प्रवेशिका अर्ज दाखल केले होते. यापैकी प्रारंभिक गायन परीक्षेत २०, प्रवेशिका प्रथम मध्ये ११, प्रवेशिका पूर्ण साठी ०९, प्रारंभिक तबला वादन ०१, प्रवेशिका पूर्ण तबला वादन ०१, मध्यमा प्रथम ०१, मध्यमा पूर्ण ०१, विशारद प्रथम ०१ आणि विशारद पूर्ण साठी ०३ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. यापैकी सर्वच विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवून यश संपादन करुन धामणगाव येथील संगीत क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयातून उत्तीर्ण



विद्यार्थ्यांचे गुण त्यांच्या दहावीच्या परीक्षेत शालेय अभ्यास क्रमात ग्राह्य धरण्यात येत असून अनेक विद्यार्थांना या गुणांचा लाभ मिळाला आहे.

संगीत गायनात विद्यार्थी दरवर्षी विशारद पदवी प्राप्त करुन भारतीय समाज मनावर अभिजात संगीताची गोडी वृध्दिंगत करीत असल्याचा आनंद सुखदायक आहे, असे मत अभिजात संगीत कलोपासक मंडळाचे संगीत मार्गदर्शक नारायण सुरंदसे यांनी व्यक्त केले आहे. समाजातील सर्व स्तरातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय पालक तथा संगीत मार्गदर्शक यांना देत आहेत.

# अमृता मिश्रा यांचे निधन



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*वरुड* – येथील किराणा व्यावसायिक सुभाष मिश्रा, प्रेमचंद मिश्रा व राजेंद्र मिश्रा यांच्या मातोश्री अमृताबाई जगनारायण मिश्रा वय ९० यांचे आज (ता.१६) पहाटे ४.३० वाजता वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार आज सकाळी ११ वाजता केदारेश्वर मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार पार पडले. अमृता मिश्रा या न.प.बांधकाम अभियंता प्रेमचंद मिश्रा यांच्या मातोश्री होत्या.

# हुल्लडबाजांच्या दुचाकी पुलावर आल्याने गर्दी झाली आणि होत्याचे नव्हते झाले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*पवनानगर* – रविवारी पावसाळी पर्यटनाच्या पार्श्वभूमीवर कुंडमळा (ता.मावळ) येथे भीषण दुर्घटना घडली. इंद्रायणी नदीवरील जुना साकव पूल कोसळून चार जणांचा मृत्यू, तर ५० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. पुलावर पर्यटकांची प्रचंड गर्दी झाल्याने आणि त्यामध्ये दुचाकी स्वारांनीही प्रवेश केल्याने पूल ताण सहन न करताच कोसळल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. पुलाच्या दोन्ही बाजूंनी दुचाकीस्वार पर्यटकांनी हुल्लडबाजी करत प्रवेश केला. त्यावेळी पुलावरच्या गर्दीत अनेकजण अडकले. त्यांचा प्रचंड भार पुलावर आल्यामुळं काही क्षणातच पूल कोसळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. रविवार असल्याने या पर्यटनस्थळी मोठ्या प्रमाणावर पर्यटक जमले होते. गर्दीने निर्माण झालेल्या भारामुळे पूल दगडांवर व काही भाग थेट पाण्यात कोसळला. अपघातानंतर अनेकजण पाण्यात अडकले, काहींना गंभीर दुखापती झाल्या. किरकोळ जखमींना प्राथमिक उपचारानंतर सोडण्यात आले असून काहींची प्रकृती चिंताजनक आहे. दुर्घटनेपूर्वीचा फोटो व्हायरल दुर्घटनेच्या काही वेळ आधीचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला असून त्यात पुलावर प्रचंड गर्दी दिसून येते.



# अंगावर गाडी घालून पोलीस अधिकाऱ्याला जीवे मारण्याचा प्रयत्न, दोघांना अटक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



*जळगाव* – जळगावमध्ये पोलीस अधिकाऱ्यांला जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गुरे चोरी करणाऱ्या टोळीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्यावर गाडी घालत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाठलाग करुन दोघांना अटक केली आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील कुंड गावाजवळ पोलिसांना पाहून कारद्वारे पळणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाठलाग केला. अकोला जिल्ह्यातील बाळापुर जवळील रिधोरा गावाजवळ पोलिसांनी रस्त्यावर चक्क ट्रक आडवा लावला आणि या टोळीची कार अडवली. त्यानंतर पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे टोळीला पकडण्यासाठी गाडीतून उतरले.

मात्र त्यावेळी या टोळीने संदीप पाटील यांच्या अंगावर थेट गाडी घालण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने संदीप पाटील हे थोडक्यात बचावले असले तरी ते किरकोळ जखमी झाले आहेत. दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी टोळीतील दोन जणांना अटक केली असून या टोळी कडून कारसह एक बैल तसेच तलवार, गुप्ती, चाकू, लोखंडी रॉडही जप्त केले आहेत.

# महावितरणच्या हलगर्जीपणा मुळे दोन शेतकऱ्यांचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*संभाजीनगर* – महावितरणच्या हलगर्जी पणामुळे दोन शेतकऱ्यांचा दुर्देवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना छत्रपती संभाजी नगरच्या चिकलठाणा परिसरात घडली. यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी चिकलठाणा हनुमान चौकात जालना रोडवर जोरदार रास्ता रोको आंदोलन छेडले होते. त्यामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. तब्बल दोन तास वाहतूक पूर्णपणे ठप्प पडली होती. मृतांमध्ये कचरु जनार्दन दहीहंडे आणि बाळू उर्फ बालाजी जनार्दन दहीहंडे या काका पुतण्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे पंधरा दिवसांपूर्वी आलेल्या वादळात या भागातील वीज वाहिनी तुटली होती. स्थानिकांनी याची वेळोवेळी माहिती महावितरणला दिली



होती. मात्र, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अखेर आज ही दुर्देवी घटना घडली असल्याचा आरोप होत आहे. अधिक माहिती अशी की, मागील काही दिवसांपासून वादळी वारा पाहायला मिळत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी विजेचे खांब वाकले असून, तारा लोंबकळत आहे. शहराजवळ असलेल्या चिकलठाणा भागातील शेतात देखील महिनाभरापासून शेतात विद्युत खांब वाकला असून विद्युतवाहिन्या लोंबकळत आहे. त्यामुळे मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असल्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी महावितरण कडे तक्रार केली होती.


## जाहीर नोटीस

### कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुकादंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**रा.मा.क्र.एम.आर.सी.८१/ गणेशपुर ( जा )/२०२४-२५**

याव्दारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **रणजीत रामचंद्रजी घरत, रा.गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती यांनी गाव ग्रामपंचायत गणेशपुर ( जा ), ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **झिबाजी बाबुराव घरत, रा.गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती यांचा मृत्यु दि.२०/०२/१९८०** रोजी झाला असल्याची नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार मृत्युची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यु नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखल करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी **२३/०५/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी वरुड**

## जाहीर नोटीस

### कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुकादंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**रा.मा.क्र.एम.आर.सी.८१/ /२०२४-२५**

याव्दारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **रणजीत रामचंद्रजी घरत, रा.गणेशपुर ( जा ), ता.वरुड, जि.अमरावती यांनी गाव ग्रामपंचायत गणेशपुर ( जा ), ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **मनाबाई झिबाजी घरत, रा.गणेशपुर ( जा ), ता.वरुड, जि.अमरावती यांचा मृत्यु दि.१५/१२/१९८५** रोजी झाला असल्याची नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार मृत्युची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यु नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखल करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी **२९/०५/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी वरुड**

## जाहीर नोटीस

### कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुकादंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**रा.मा.क्र.एम.आर.सी.८१/ /२०२४-२५**

**सातनुर**

याव्दारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **संगीता गडीराम भाजीखाये, रा.सातनुर, ता.वरुड, जि.अमरावती यांनी गाव ग्रामपंचायत सातनुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **संगीता गडीराम भाजीखाये, रा.सातनुर, ता.वरुड, जि.अमरावती यांचा जन्म दि.२५/०८/१९७६** रोजी झाला असल्याची नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखल करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी **२३/०५/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी वरुड**

# बेनोड्यात स्वाभिमानी पक्षाची मुसंडी : देवेंद्र भुयार, शिल्पा पवार विजयी

## तत्कालिन आजी-माजी आमदारांसह माजी कृषिमंत्र्यांना हुलकावणी देत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - मिनी मंत्रालय म्हणुन संबोधल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका कधी होणार? याबाबत अनिश्चितता कायम असतांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे किमान येत्या दिवाळीपर्यंत तरी या निवडणुकांचा बिगुल वाजेल, असे अंदाज व्यक्त केल्या जात आहे. २१ फेब्रुवारी २०१७ मध्ये तालुक्यात ५ जिल्हा परिषद आणि १० पंचायत समिती सदस्यांकरीता निवडणुक पार पडली होती. २० फेब्रुवारी २०२२ रोजी या सर्व सदस्यांचा कार्यकाळ पुर्ण झाला परंतु निवडणुका घेण्यासंदर्भातील प्रकरण न्यायालयात प्रलंबित झाल्यामुळे गेल्या ३ वर्षांपासुन निवडणुका लांबल्या होत्या. अशा स्थितीत राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशिल म्हणुन संबोधल्या जाणाऱ्या बेनोडा



(शहीद) जिल्हा परिषद सर्कलचा २०१७ वर्षातील राजकीय आखाडा कसा होता? कोण-कोणासोबत निवडणुक लढविली होती? याचा उलगडा आपण करणार आहोत.

तालुक्यातील एकमेव सर्वसाधारण असलेल्या या सर्वाधिक राजकीय संवेदनशिल समजल्या जाणाऱ्या या सर्कलच्या लढतीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते. या बेनोडा (शहीद) जि.प.सर्कल मतदारसंघात ७ उमेदवार निवडणुक रिंगणात असले तरी पंचरंगी लढत होईल, अशी चिन्हे दिसून येत होते. अनेक दिग्गज या मतदारसंघातून निवडणुक लढवित असल्यामुळे कोण निवडुण येणार? याबाबत कोणीही ठामपणे सांगु शकत नव्हते परंतु तत्कालीन आमदार डॉ.अनिल बोंडे, माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे व माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख यांना हुलकावणी देत स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे देवेंद्र भुयार यांनी विजय संपादन केला होता.

बेनोडा (शहीद) मतदारसंघामध्ये बेनोडा (शहीद), जामगांव, खडका, गोरेगांव, खडका, टेंभुरखेडा, इसंब्री, तिवसाघाट, पळसोना, झटामझिरी, गव्हाणकुंड, बहादा ही गांवे येतात. बेनोडा जिल्हा परिषद सर्कलमध्ये १२ हजार १८६ पुरुष आणि ११ हजार २८६ स्त्रियांना मतदानाचा अधिकार होता एकूण २३ हजार ४७२ मतदार होते. हा मतदारसंघ तालुक्यातील एकमेव सर्वसाधारण गटामध्ये असल्यामुळे या मतदारसंघातून नशीब अजमाविण्याकरीता अनेकांची नांवे चर्चेत होती परंतु यापुर्वी अनेक वर्षांपासुन या सर्कलमध्ये कार्यरत असलेल्यांनाच सर्व पक्षांनी उमेदवारी दिली आणि बाहेरील उमेदवार कुणीही आयात केला नाही, हे विशेष.

या सर्कलमध्ये एकूण ७ उमेदवार निवडणुक रिंगणात होते, त्यामध्ये टेंभुरखेडाचे माजी सरपंच शंकरराव उमेकर यांचे सुपूत्र डॉ.मनोज शंकरराव उमेकर हे आमदार बच्चू कडु यांच्या प्रहार संघटनेकडून, बेनोड्यातील शिवसैनिक अमित कुबडे हे शिवसेनेच्या वतीने, गणेश बापुराव कुसराम (अपक्ष), पळसोना येथील शरद गुडधे पाटील (अपक्ष), कृषि उत्पन्न बाजार समिती माजी सभापती नरेंद्र चोरे हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे उमेदवारी म्हणुन, शेतकरी स्वाभिमानी संघटनेचे देवेंद्र भुयार, भाजपा युवा कार्यकर्ते तथा विद्यमान जिल्हा परिषद सदस्या अर्चना मुरुमकर यांचे पती निळकंठ उर्फ बाळु मुरुमकर नशीब अजमावले होते.

बेनोडा पंचायत समिती सर्कलमध्ये ५ हजार ९५८ पुरुष आणि ५ हजार ४२६ स्त्रिया मतदानाचा हक्क होता. या सर्कलमध्ये ६ उमेदवार निवडणुक रिंगणात होते. त्यामध्ये जयश्री ज्ञानेश्वर गोहाड (भाजपा), माया उमेश घोंगडे (शिवसेना), वंदना अरविंदराव ठाकरे (प्रहार), शिल्पा संजयराव पवार (शेतकरी स्वाभिमानी पक्ष), सुषमा मनोज पेलागडे (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) आणि अश्विनी रमेश बनकर (गोंडवाना गणतंत्र पार्टी) यांचा समावेश होता.

अनुसूचित जातीच्या स्त्रि करीता राखीव असलेल्या टेंभुरखेडा पंचायत समिती सर्कलमध्ये ६ हजार २२८ पुरुष आणि ५ हजार ५८९ स्त्रिया मतदानाचा हक्क होता. या सर्कलमध्ये सुनिता दिगांबरराव गावंडे (प्रहार), सुवर्णा गणेश पाटील (आंबेडकर रिपाई), इंद्रगिता दादाराव मोहेकर (शिवसेना), सुनंदा रामभाऊ रामटेके (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), ललिता नामदेव लांडगे (भाजपा) यांचा समावेश होता.

मतमोजणी अंती बेनोडा (शहीद) जिल्हा परिषद सर्कलमधून स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे देवेंद्र भुयार यांना ८ हजार ४०९ मते तर भाजपाचे निळकंठ मुरुमकर यांना ४ हजार ४०९ मते प्राप्त झाली होती, देवेंद्र भुयार यांचा ४ हजार मतांनी विजय झाला होता. बेनोडा पंचायत समिती सर्कलमधून स्वाभिमानी शेतकरी पक्षाच्या शिल्पा पवार ३ हजार ३९५ मते तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुष्मा मनोज पेलागडे यांना २ हजार २०० मते प्राप्त होवुन शिल्पा पवार यांचा १ हजार १९५ मतांनी विजय झाला होता. टेंभुरखेडा पंचायत समिती सर्कलमध्ये मात्र राष्ट्रीय काँग्रेसच्या सुनंदा रामभाऊ रामटेके यांना २ हजार २७८ तर भाजपाच्या ललिता नामदेव लांडगे यांना ४ हजार १६३ मते प्राप्त झाली होवुन ललिता लांडगे यांचा १ हजार ८८५ मतांनी विजय झाला होता.

**पंचायत समिती सर्कल बेनोडा ( शहीद )**

| उमेदवाराचे नांव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| जयश्री ज्ञानेश्वर गोहाड | भाजपा | १५८७ |
| माया उमेश घोंगडे | शिवसेना | ७२९ |
| वंदना अरविंद ठाकरे | प्रहार | १२१ |
| **शिल्पा संजय पवार** | **स्वाभिमानी पक्ष** | **३३९५** |
| सुष्मा मनोज पेलागडे | राष्ट्रवादी काँग्रेस | २२०० |
| अश्विनी रमेश बनकर | गोंडवाना पार्टी | १९८ |

**जिल्हा परिषद सर्कल बेनोडा ( शहीद )**

| उमेदवाराचे नांव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| डॉ.मनोज शंकरराव उमेकर | प्रहार | ३३७ |
| अमित रामदास कुबडे | शिवसेना | ७२७ |
| कुसराम गणेश बापुराव | अपक्ष | ७५ |
| शरद वसंतराव गुडधे | अपक्ष | २१४ |
| नरेंद्र भाऊराव चोरे | राष्ट्रीय काँग्रेस | २९७० |
| भगवंत गणपती पंडागळे | मनसे | ** |
| **देवेंद्र महादेव भुयार** | **स्वाभिमानी पक्ष** | **८४०९** |
| निळकंठ संतोषराव मुरुमकर | भाजपा | ४४०९ |

**पंचायत समिती सर्कल टेंभुरखेडा**

| उमेदवाराचे नांव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|
| सुनिता दिगांबरराव गावंडे | प्रहार | ५४४ |
| सुवर्णा गणेश पाटील | रिपाई | ९१६ |
| इंद्रगिता दादाराव मोहेकर | शिवसेना | ६४७ |
| सुनंदा रामभाऊ रामटेके | राष्ट्रीय काँग्रेस | २२७८ |
| **ललिता नामदेव लांडगे** | **भाजपा** | **४१६३** |

# जलसेवा भावी ग्रुप गेल्या अनेक वर्षापासून तहानलेल्यांची भागवते तहान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*धामणगावरेल्वे* - उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सर्वात जास्त गरज थंड पाण्याची गरज असून, रेल्वेमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशा ना पाण्याच्या बॉटल विकत घ्यावे लागते.

मात्र जनरल डब्यामध्ये असलेल्या गर्दीमुळे अनेकांना पाणी घ्यायसाठी स्टेशनवर उतरता येत नाही. त्यामध्ये लहान मूल, स्त्रिया, पुरुषांना, वृद्धांना सतत गर्मीच्या दिवसात पाण्याची गरज असते. या सर्वांचा विचार करुन धामणगांवआतील काही महिला, पुरुष यांनी सेवाभावी ग्रुप तयार





केले.

सेवाभावी ग्रुपचे सदस्यांनी थंड पाण्याची व्यवस्था प्रवाशांसाठी केली असून, गाड्यांमध्ये प्रवाशांना पाणी वाटप करायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र एक्सप्रेस, अहमदाबाद एक्सप्रेस, विदर्भ एक्सप्रेस, मेल एक्सप्रेस व अनेक अशा गाड्यांमध्ये निस्वार्थपणे सर्व रेल्वे प्रवाशांना थंड पाणी पुरवण्याचे काम सेवाभावी ग्रुपचे सदस्य करतात. आपले कामधंदे बाजूला सारुन महिला, पुरुष रेल्वे गाड्यांच्या वेळेवर स्टेशनवर येतात व जेवढ्या प्रवाशांना होईल तेवढ्या प्रवाशांना पाणी देण्याचे काम करतात.

त्यांची ही प्रवाशांसाठी तळमळ पाहून प्रवासी सुद्धा त्यांना मनापासून धन्यवाद देतात. यामध्ये धामणगाव रेल्वे स्टेशनचे स्टेशन मास्टर, रेल्वे पोलीस सुरक्षा कर्मचारी व कर्मचारी यांचे सुद्धा योगदान असते. जल सेवा भावी ग्रुप च्या उत्कृष्ट अशा कार्याचे शहरात नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# सुधाकर बडगुजर यांचा भाजप प्रवेश होणार की नाही?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*नागपूर* - शेकडो वाहने, हजारो कार्यकर्त्यांसह शिवसेना ठाकरे गटाचे नेते सुधाकर बडगुजर आज भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. सुधाकर बडगुजर सकाळी नाशिकहून मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. मात्र भाजप प्रदेशाध्याक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना या पक्षप्रवेशाची माहिती आहेत की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल कुठलीही माहिती माझ्याकडे नाही, अशी प्रतिक्रिया चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. भाजप पक्षप्रवेशाबद्दल विचारणा



केली असता चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं की, सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल कुठलीही माहिती माझ्याकडे नाही. स्थानिक नेतृत्व, स्थानिक आमदार आणि खासदार यांचा एकमत झाल्याशिवाय आमच्याकडे पक्षप्रवेश होत नाही. सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल मला कुठलीही माहिती नाही. नाशिकचे स्थानिक पदाधिकाऱ्यांचा या पक्षप्रवेशाला विरोध आहे. निवडणुकीच्या राजकारणात जेव्हा आपण एकमेकांच्या विरोधात लढतो आणि आता निवडणुकीला फक्त सहा महिने झाले आहे. त्यामुळे विरोधाची भावना असते आणि त्यामुळे नाशिकमध्ये त्यांना विरोधाची भावना आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्यामुळे संभ्रम वाढला आहे. एक वाजता भाजप पक्ष कार्यालयात पक्षप्रवेश सोहळा होणार असल्याची सुधाकर बडगुजर यांनी माहिती दिली आहे. मात्र प्रवेश सोहळा होणार की नाही? झाला तर बावनकुळे उपस्थित राहणार का ? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.




वरुड दर्पण

प्रतिनिधी (पत्रकार) नेमणे आहे

संपुर्ण जिल्हयात अल्पावधीतच नावारुपास आलेल्या दैनिक वरुड दर्पण या वृत्तपत्राकरीता अमरावती जिल्हयात तालुकास्तरावर प्रतिनिधी (पत्रकार) नेमणे आहे. अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. इच्छुकांनी आपला अर्ज खालील व्हॉटस्अॅप क्रमांकावर पाठवावा.

* मोर्शी * अमरावती * धामणगांव रेल्वे * चांदुर बाजार
* परतवाडा * चांदुर रेल्वे * वलगाव * नांदगांव खंडेश्वर * धारणी
* अचलपुर * धारणी * दर्यापूर * भातकूली * तिवसा

७७४५०६७७१२

* संपर्कासाठी पत्ता *
दैनिक वरुड दर्पण कार्यालय
जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती ४४४९०६